तरुण भारत

सोमवार २८ ऑक्टोबर २०२४

# विवेकानंद कॉलेजला नॅकची 'ए प्लस' ग्रेड प्राप्त

## विवेकानंद कॉलेजला (स्वायत्त) नॅक मूल्यांकनामध्ये दैदिप्यमान यश

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त) या महाविद्यालयास १४ व १५ ऑक्टोबर २०२४ रोजी नॅकच्या चौथ्या सायकलसाठी नॅक पिअर टीमने भेट दिली. विवेकानंद कॉलेजने आपल्या गुणवत्तेमध्ये वाढ करून राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक)चे ३.२९ सीजीपीए मेन 'ए प्लस' ग्रेड प्राप्त आहे. सन २०१६ मध्ये झालेल्या नॅक मूल्यांकनात ३.२४ सीजीपीए मेन ए ग्रेड मिळालेली होती. चौथ्या सायकलमध्ये नॅकचे 'ए प्लस' ग्रेड मिळवून पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिध्द केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी






प्राचार्य, प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

नॅक पिअर समितीमध्ये प्रमुख संबळपूर विद्यापीठ, ओरिसाचे माजी कुलगुरु प्रोफेसर बिष्णू चरण बरीक हे होते. तर समितीचे समन्वयक अलिगड मुस्लीम विद्यापीठ, उत्तरप्रदेश मधील कॉमर्स विभागप्रमुख व माजी डीन डॉ. नवाब अली खान व समितीचे सदस्य एम. जी. सायन्स इन्स्टिटयूट, अहमदाबाद, गुजरातचे प्राचार्य डॉ. भानूकुमार जैन यांचा समावेश होता. नॅक मूल्यांकन जाहीर होताच संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या त्यागातून आणि ध्येयातून उभा राहिलेल्या संस्थेच्या नावलौकिकात भर घातली आहे. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, विवेकानंद कॉलेज पश्चिम महाराष्ट्रातील अग्रमानांकित आहे. कला, क्रिडा, शिक्षण, आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, विवेकानंद कॉलेज शिवाजी विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील नेहमीच अग्रेसर कॉलेज म्हणून ओळखले जाते. गेल्या सहा वर्षात महाविद्यालयाच्या प्रत्येक घटकाने घेतलेल्या कष्टाचे हे यश आहे. समन्वयक डॉ. श्रुती जोशी म्हणाल्या, महाविद्यालयाच्या वाटचालीमध्ये नॅक मूल्यांकन ही महत्त्वाची गोष्ट आहे. कॉलेजमध्ये प्रत्येक घटकाने घेतलेले कष्ट आणि केलेली मदत यामुळेच मी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकले.

नॅक स्टेअरिंग कमिटीप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी म्हणाले, विवेकानंद कॉलेजला मिळालेल्या यशात कॉलेजमधील सर्वच घटकांचा मोठा वाटा आहे. प्रत्येक घटकांने केलेली जीवतोड मेहनत आणि कॉलेजच्या विकासात बजावलेली भूमिका यातूनच आपल्याला हे यश मिळाले आहे. या यशासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्रशासकीय कर्मचारी प्रमुख हितेंद्र साळुंखे, नाईक रवी चौगुले व सर्व प्रशासकीय कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

28/10/2024

PR 28.10.24

पुण्य नगरी

कोल्हापूर । सोमवार, २८ ऑक्टोबर २०२४

# स्वामी विवेकानंद कॉलेजला नॅककडून 'ए

कोल्हापूर : प्रतिनिधी

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) या महाविद्यालयास दि. १४ व १५ ऑक्टोबर रोजी नॅक पिअर टीमने भेट दिली. अधिकारप्रदत्त स्वायत असणाऱ्या विवेकानंद कॉलेजने आपल्या गुणवत्तेमध्ये वाढ करून राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक) च्या 'फोर्थ सायकल'मध्ये ३.२९ 'सीजीपीए'सह 'ए प्लस' ग्रेड मिळवली आहे, तर २०१६ मध्ये झालेल्या नॅक 'थर्ड सायकल'मध्ये विवेकानंद कॉलेजला ३.२४ 'सीजीपीए'सह 'ए' ग्रेड मिळाली



प्राचार्य, डॉ. आर. आर. कुंभार

होती. त्यानंतर महाविद्यालयाने स्वायत्त होण्याचा बहुमान पटकावला होता.

नॅक समितीचे प्रमुख संबळपूर विद्यापीठ, ओरिसाचे माजी कुलगुरू प्रा. बिष्णू चरण बरीक हे होते, तर समितीचे समन्व्यक अलीगड मुस्लिम विद्यापीठ, उत्तर प्रदेशमधील कॉमर्स विभागप्रमुख व माजी डीन डॉ. नवाब अली खान व समितीचे सदस्य एम. जी. सायन्स इन्स्टिट्यूट, अहमदाबाद, गुजरातचे प्राचार्य डॉ. भानूकुमार जैन यांचा समावेश होता.

या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या त्यागातून आणि ध्येयातून उभा राहिलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नावलौकिकात विवेकानंद कॉलेजने अजून भर घातली आहे. विवेकानंद कॉलेजने अशीच उत्तमोत्तम प्रगती करावी.

संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे म्हणाले, विवेकानंद कॉलेज हे पश्चिम महाराष्ट्रातील अग्रमानांकित महाविद्यालय आहे. विवेकानंद




कॉलेजने कला, क्रीडा, शिक्षण, आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. महाविद्यालयाच्या यशाचा हा महामेरु असाच पुढे चालत राहावा.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, महाविद्यालयाने स्थापनेपासूनच नावीन्यपूर्ण उपक्रम

राबवण्यावर
कॉलेज हे
परिक्षेत्रातील
म्हणून ओव
त्याचब
समन्वयक
स्टेअरिंग कर
आर. कट्टीम
केले. नॅक व
आर. आर.
समन्वयक प्र
स्टेअरिंग क
आर. कट्टीम
जोग, प्रशास
हितेंद्र साळुं
विशेष परिश्र